# दक्षता पथक

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक कार्यालयात दक्षता पथकाची स्थापना करण्यात आली असून या पथकामध्ये ०१ पोलीस उपअधीक्षक, ०३ पोलीस उपनिरीक्षक व ०२ सुरक्षा रक्षक (कारागृह शिपाई) तसेच ०२ वाहन चालक असे **एकूण ०८** अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर पदे आहेत. त्यापैकी सध्या ०१ प्र.पोलीस उपअधीक्षक, ०१ पोलीस उपनिरीक्षक, ०२ सुरक्षा रक्षक (कारागृह शिपाई), व ०२ वाहन चालक असे **एकूण ०६ अधिकारी/कर्मचारी** हे दक्षता पथकात कार्यरत आहेत. या पथकाचे कामाचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

**१)** मा. अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक यांच्या आदेशान्वये राज्यातील विविध कारागृहात अचानकपणे झडती घेणे/तपासणी करणे.

**२)** मा.अ. पो. म. सं. व का. म. नि. यांनी दिलेल्या आदेशानुसार तक्रार अर्जाची चौकशी करणे.

**३)** राज्यातील कोणत्याही कारागृहात आकस्मिक घटना घडल्यास मा.महोदयांच्या आदेशान्वये घटनेच्या ठिकाणी हजर राहून तेथील चौकशी करणे.

**४)** मा.अ. पो. म. सं. व का. म. नि. यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे.